राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

## सन : २०२३-२४

## नवोपक्रम शीर्षक

# “वाचू आनंदे”


**सादरकर्ता**

**श्री गणेश भिकाजी नाईक**

**उपशिक्षक**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पेंडूर खरारे

तालुका : मालवण, जिल्हा : सिंधुदुर्ग

**मार्गदर्शक**

**डॉ.लवू आचरेकर**

**अधिव्याख्याता**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग


**सन**

२०२२-२३

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **नवोपक्रमाचे शीर्षक** | ३ |
| २ | **नवोपक्रमाची गरज व महत्व** | ३ |
| ३ | **नवोपक्रमाची उद्दिष्टे** | ६ |
| ४ | **नवोपक्रमाचे नियोजन** | ७ |
| | उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण | ७ |
| | संबंधित व्यक्तींशी, तज्ञांशी चर्चा | ७ |
| | आवश्यक साधनांचा विचार | ८ |
| | करावयाच्या कृतींचा क्रम | ८ |
| | उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण | ९ |
| | कार्यवाहीचे टप्पे | ९ |
| | उपक्रमासाठी इतरांची मदत | १० |
| | उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे | १० |
| ५ | **नवोपक्रमाची कार्यपद्धती** | १२ |
| | पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी | १२ |
| | कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन | १४ |
| | उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्यांच्या नोंदी | १५ |
| | कार्यवाहीत आलेल्या अडचणी | १७ |
| | माहितीचे विश्लेषण : आलेख, तक्ते ( आवश्यक वाटल्यास) | १८ |
| ६ | **नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार)** | २५ |
| ७ | **समारोप** | २५ |
| ८ | **संदर्भ सूची व परिशिष्टे** | २६ |

**१) नवोपक्रमाचे शीर्षक :** “वाचू आनंदे”

**२) नवोपक्रमाची गरज व महत्व :**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पेंडूर खरारे या शाळेत २७ ऑक्टोबर २०२० रोजी जिल्हा बदलीने रुजू झालो कोविड १९ विषाणूंच्या संसर्गामुळे शाळा सुरु नव्हत्या त्या नंतर काही कालावधीसाठी शाळा सुरु झालेल्या होत्या परंतु मुलांसाठी अंगणवाड्या सुरु झाल्या नव्हत्या परिणामी २०२२ -२३ या शैक्षणिक वर्षात आमच्या शाळेत येणारी मुलं ही अंगणवाडीत जाता आले नव्हते. शाळापूर्व तयारी मेळाव्यांनंतर  विद्याप्रवेश कार्यक्रम जून ते सप्टेंबर या कालावधीत शाळेत राबविला गेला. सप्टेंबर २०२२ नंतर पहिलीतील विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर पडताळून पाहताना मला असे आढळून आले की, विद्यार्थ्यांना शब्द वाचन करताना अडथळे निर्माण होत आहेत. नीट विश्लेषण केले असता असे आढळून आले की विद्यार्थ्यांना काही अक्षरांचे वाचन करता येत नाही. यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक वाटू लागले.

भाषा विषयात संभाषण नंतर महत्वाची पायरी येते ती म्हणजे वाचन. वाचनासाठी मुळाक्षरे ओळखून वाचता येणे खूप गरजेचे आहे. त्याशिवाय आपण शब्द, वाक्य, उतारा वाचू शकत नाही. त्यामुळे या समस्येच्या निराकरणासाठी मी हा नवोपक्रम राबविण्याचा ठरविला.

- **नवोपक्रमाचे वेगळेपण :**

या नवोपक्रमाचे वेगळेपण असे आहे की,

**१) चित्रयुक्त अध्ययन कार्ड :**

पाठ्यपुस्तक तसेच इतर पुस्तकांमध्ये चित्रांच्या सहाय्याने अक्षरे शिकविली जातात. परंतु ही चित्रे दोन ते चार पेक्षा जास्त नसतात. अक्षरे शिकविताना आपण विद्यार्थ्याच्या दैनंदिन जीवनातील अनुभविलेल्या वस्तू आपण चित्र स्वरुपात दाखविल्यास विद्यार्थ्यांना त्या शब्दात लपलेली अक्षरे ओळखण्यास सुलभ होईल व

अक्षरांचा संबोध स्पष्ट होईल. यासाठी अक्षरांचे विविध गट करून प्रत्येक अक्षरापासून सुरु होणाऱ्या चित्रांचा संग्रह करण्यात आला. चित्र व खाली त्याचे नाव अशी अशी अध्ययन कार्ड बनवली. अशी एकूण ११०० हून अधिक शब्दांची कार्ड बनविण्यात आली. यातील ८० % शब्द हे विद्यार्थ्यांच्या ओळखीचे आहे.

**२) Pdf स्वरूपातील अध्ययन कार्ड :**

वरील सर्व ११०० हून अधिक कार्ड विविध गटांनुसार pdf स्वरुपातसुद्धा बनविण्यात आल्या. यामुळे सदर pdf विद्यार्थ्यांच्या पालकांशी शेअर आकरण्यात आली. त्या pdf च्या सहाय्याने पालकांना घराकडे विद्यार्थ्यांचा सराव घेणे सुलभ होईल.

**३) व्हिडीओ स्वरूपातील अध्ययन कार्ड :**

गटांनुसार अध्ययन कार्डांचे व्हिडीओ बनविण्यात आले. या व्हिडीओना आवाज न देता ठराविक कालावधीने अध्ययन कार्ड सदर व्हिडीओ मध्ये दिसतात. विद्यार्थ्यांनी सदर चित्र बघून चित्राचे नाव संगतील. यातून त्यांचे दृढीकरण होण्यास मदत होईल.

**४) इतर विषयांशी समवाय :**

दृश्य स्वरूपातील अध्ययन हे निरंतर टिकणारे असते.त्यामुळे वरील अध्ययन कार्डाचा वापर केल्याने विद्यार्थ्यांना अक्षरे तसेच शब्द स्मरणात ठेवणे सुलभ वाटू लागले. या कार्डांमुळे गणित, परिसर, इंग्रजी, सामान्य ज्ञान या विषयांशी समवाय साधणे सोपे होईल. प्राणी, पक्षी, फळे, अंक, रंग, आकार, भाज्या, भांडी, फुले, व्यवसाय, व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती, सण, उत्सव, खेळणी, मराठीत आलेले इंग्रजी शब्द घरातील विविध वस्तू, विविध कृती हे वरील अध्ययन कार्डांमुळे वेगळे शिकविण्याची गरज भासणार नाही.

**५) शब्द कार्ड :**

अक्षर ओळख झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विविध तक्त्यांद्वारे शब्दांची ओळख करून देणे सोपे होईल. ३४00 हून जास्त शब्दांचा संग्रह करून या शब्दांच्या सरावामुळे विद्यार्थ्यांना वाक्य वाचन व उतारा वाचन करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अक्षर ओळख ते शब्दवाचन हे आनंदाई होईल. सदर सर्व कार्ड, तक्ते हे pdf, व्हिडीओ तसेच प्रिंट स्वरुपात वापरण्यात येतील.

**६) वाचनपुस्तिका :**

या नवोपक्रमात वापरण्यात येणारे सर्व साहित्य एकत्रित करून एक पुस्तिका बनविण्यात येणार आहे. यात चित्र-अक्षर कार्ड, शब्द तक्ते यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पुस्तिकेचा वापर दृढीकरणासाठी होणार आहे. तसेच इतर शिक्षकांना या अध्ययन सहाय्यक वाचनपुस्तिकेचा उपयोग होईल.

- **नवोपक्रमाचे महत्व :**

वाचनाची पहिली पायरी म्हणजे अक्षर ओळख. अक्षर ओळखण्यात अडथळे निर्माण झाल्यास शब्द वाचन, वाक्यावचन व उतारे वाचन यामध्ये मागे राहण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळीच अक्षर ओळखीमधील विद्यार्थ्यांची अडचण दूर करणे आवश्यक आहे. या नवोपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीने विद्यार्थ्यांना अक्षर ओळख करताना येणारी अडचण दूर होण्यास मदत होईल. तसेच विद्यार्थी उतारा वाचन पर्यंत जाण्याचा वेग वाढेल. त्याला वाचनाची गोडी निर्माण होईल. वरील साहित्य पूरक साहित्य म्हणून माझ्यासोबत इतर शिक्षकांना नक्कीच उपयोगी पडेल याची मला खात्री वाटते.

**या उपक्रमामुळे........**

१) विद्यार्थ्याची अक्षर ओळख करतना येणारी अडचण दूर होईल.

२) विद्यार्थ्याला वाचनाची आवड निर्माण होईल.

३) इतर विषयांशी समवाय साधणे सुलभ होईल.

४) विद्यार्थी जलद गतीने उतारा वाचनापर्यंत पोहचेल.

**३) नवोपक्रमाची उद्दिष्टे :**

- विद्यार्थ्यांना अक्षर वाचन करता येणे.
- विद्यार्थ्यांना शब्द वाचन करता येणे.
- विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण करणे.
- ई लर्निंग, अध्ययन कार्ड साहित्याची निर्मिती करून त्याचा अध्ययन अध्यापनात त्याचा परिणामकारक उपयोग करणे.
- वाचन उपक्रमाच्या माध्यमातून अधिक मनोरंजक बनविणे.

**४) नवोपक्रमाचे नियोजन :**

नवोपक्रमाचे खालील मुद्द्यांच्या आधारे नियोजन करण्यात आलेले आहे.

**i. उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :**

कोविड 19 विषाणूंच्या संक्रमणामुळे अंगणवाड्या सुरु झाल्या नव्हत्या त्यामुळे २०२२-२३ ला शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचा अपेक्षित मानसिक, बौद्धिक विकास झालेला नव्हता. शालापूर्व तयारी तसेच विद्याप्रवेश कार्यक्रम राबविल्यानंतर अध्ययन स्तराची पडताळणी केली असता विद्यार्थ्यांमध्ये अक्षर स्तरावर काहीसे अडखळलेले दिसले. अक्षर ओळखताना येणाऱ्या समस्यांचे वेळीच निराकारण होणे गरजेचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची अक्षर ओळखण्याची समस्या वेगवेगळी होती. नेहमी वापरात येणारे साहित्य काहीसे अपुरे पडल्यासारखे वाटत होते. वाचनाचा पहिला टप्पा अक्षर ओळख हाच आहे ही समस्या दूर

केल्यानंतरच विद्यार्थी वाचनाच्या पुढील टप्प्यापर्यंत पोहचू शकतो. पारंपारिक पद्धती मध्ये बदल करून विविध उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचे दिसून आले. विविध उपक्रमांचे नियोजन करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

ii. **संबंधित व्यक्तींशी, तज्ञांशी चर्चा :**

वरील अक्षर ओळख समस्या निराकरण करणे आवश्यक होते. यासाठी मी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता डॉ लवू आचरेकर सर यांनी यासाठी योग्य असे मार्गदर्शन केले. केंद्रातील शिक्षकांशी याबाबत चर्चा केली. पालकांचा या उपक्रमांसाठी सहभाग कशाप्रकारे घेता येईल याबाबत निवडक पालकांशी चर्चा केली. राज्यस्तरीय Whatsapp समूहात याबाबत चर्चा घडवून आणली. त्यातून मला बहुमुल्य असे मार्गदर्शन मिळाले. या समस्या निराकरणासाठी ई लर्निंग साहित्य निर्मिती कशी करता येतील याबाबत तंत्रस्नेही शिक्षकांशी चर्चा केली. त्यातून मला निर्माण झालेल्या समस्येवर उपाययोजना करायला योग्य दिशा मिळाली.

iii. **आवश्यक साधनांचा विचार :**

सदर नवोपक्रमातील अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी विविध साधने वापरणे आवश्यक होते. या साधनांपैकी मुख्य साधन म्हणजे अध्ययन कार्ड बनविण्यासाठी चित्र स्वरुपात दाखवता येणाऱ्या शब्दांचा व चित्रांचा संग्रह करणे. या चित्रांची ppt च्या सहाय्याने आकर्षक एडिटिंग करून चित्र व खाली त्या चित्राचे नाव तसेच ज्या अक्षरापासून शब्दाची सुरुवात होते ते अक्षर हायलाईट करणे. या अध्ययन कार्डांची विविध गटांमध्ये विभागणी करून त्याप्रमाणे pdf तसेच व्हिडिओ बनविणे. अध्ययन कार्डांची छपाई करणे, शब्दांचे तक्ते प्रिंट मारणे, सरावासाठी सर्व साधनांची एकत्रित पुस्तिका तयार करणे इत्यादी गरजेचे आहे.

**iv. करावयाच्या कृतींचा क्रम :**

- पूर्व चाचणीद्वारे अध्ययन स्तर निश्चिती करणे.
- विद्यार्थ्यांच्या अक्षर वाचनातील चुका शोधून काढणे.
- अध्ययन कार्ड निर्मिती करणे.
- विविध गटानुसार अध्ययन कार्ड प्रिंट मारणे, pdf बनविणे व व्हिडीओ बनवणे.
- अध्ययन कार्डच्या गटानुसार कृती निश्चित करणे.
- कृतींची अंमलबजावणी करणे.
- उपक्रमानंतर उत्तर चाचणी द्वारे अध्ययन स्तर निश्चिती करणे.
- उत्तर चाचणीद्वारे निष्कर्ष काढून घेणे.

**v. उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :**

विविध उपक्रमाचे नियोजन करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केल्यानंतर सकारात्मक परिणाम दिसून आले. नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अक्षर ओळखता येऊ लागली. ८०% विद्यार्थी शब्द वाचानापर्यंत पोहचले. ८०% विद्यार्थी जोडाक्षरे वाचू लागले. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण झाली. ई लर्निंग, अध्ययन कार्ड साहित्याचा अध्ययन अध्यापनात त्याचा परिणामकारक उपयोग झाला. या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तन बदल दिसून आला. जे ध्येय निश्चित केलेले ते साध्य झाल्याचे आत्मसमाधान प्राप्त झाले.

**vi. कार्यवाहीचे टप्पे :**

| अ.नं. | तपशील | तपशील |
|---|---|---|
| १ | पूर्व चाचणी | २१ ऑक्टोबर २०२२ |
| २ | ग म भ न अक्षर कार्ड वाचन | नोव्हेंबर २०२२ |
| ३ | ल व ब क ळ अक्षर कार्ड वाचन | |
| ४ | र स श ख अक्षर कार्ड वाचन | |
| ५ | ण प ष फ अक्षर कार्ड वाचन | |
| 6 | ट ढ ठ द क्ष अक्षर कार्ड वाचन | |
| ७ | ड इ ई झ ह अक्षर कार्ड वाचन | |
| ८ | च घ ध छ अक्षर कार्ड वाचन | |

| | | |
|---|---|---|
| ९ | य थ ज ज्ञ ऋ अक्षर कार्ड वाचन | |
| १० | अ आ ओ औ अं ॲ ऑ अक्षर कार्ड वाचन | |
| ११ | उ ऊ ए ऐ अक्षर कार्ड वाचन | |
| १२ | जोड शब्द अक्षर कार्ड वाचन | |
| १३ | आकार विरहित शब्द वाचन | डिसेंबर २०२२ |
| १४ | कानायुक्त शब्द वाचन | |
| १५ | पहिली वेलांटी शब्द वाचन | |
| १६ | दुसरी वेलांटी शब्द वाचन | |
| १७ | पहिला उकार शब्द वाचन | |
| १८ | दुसरा उकार शब्द वाचन | |
| १९ | एक मात्रा शब्द वाचन | |
| २० | दोन मात्रा शब्द वाचन | |
| २१ | एक काना एक मात्रा शब्द वाचन | |
| २२ | एक काना दोन मात्रा शब्द वाचन | |
| २३ | अनुस्वार शब्द वाचन | |
| २४ | विसर्ग शब्द वाचन | |
| २५ | ॲ चे शब्द वाचन | |
| २६ | ऑ चे शब्द वाचन | |
| २७ | जोडाक्षरी शब्द वाचन | |
| २८ | उत्तर चाचणी | २ जानेवारी २०२३ |

vii) **उपक्रमासाठी इतरांची मदत :**

या उपक्रमासाठी मला जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग चे अधिव्याख्याता डॉ. लवू आचरेकर सर यांनी नवोपक्रम निश्चितीपासून अहवाल लेखनापर्यंत वेळोवेळी मार्गदर्शन केले. माझ्या शाळेतील तसेच केंद्रातील शिक्षकांनी मदत केली. पालकांनी मी वेळोवेळी पाठवलेले व्हिडीओ, pdf, गुगल फॉर्म विद्यार्थ्यांना दाखवून त्यांच्याकडून सांगितलेल्या कृती करून घेतल्या. माझे मित्र सुनिल करडे यांनी उपक्रम निर्मिती व अहवाल टंकलिखित तसेच तांत्रिक कामासाठी मदत केली.

viii) **उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :**

सदर उपक्रम राबवित असताना मार्गदर्शनासाठी बनविलेली कार्ड्स, तक्ते, व्हिडिओ, यु ट्यूब वरील व्हिडिओ, बनविलेले साहित्य यांचे व्हिडीओ माझ्या गुगल ड्राईव्ह व माझ्या Youtube Channel वर जतन करण्यात आलेले आहेत. त्यांच्या link खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं | तपशील | Google Drive link | Youtube link |
|---|---|---|---|
| १ | ग म भ न अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1_lLo66rmsjAoGpNgkgJRJnh31Cy9gPeW/view?usp=drive_link | https://youtu.be/Zo9XpOZgzLc?si=SilWQlJveilaZFtO |
| २ | ल व ब क ळ अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1zAyxbX22xSaHU-zp2pnvOZhA1HPyL0ok/view?usp=drive_link | https://youtu.be/hmZzHE83Rmo?si=d-TcllS4cL0QsJqW |
| ३ | र स श ख अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1TBeNRYa8bOWU_vTSML_u2zlpuWG0Oah2/view?usp=drive_link | https://youtu.be/wPSrVaYmWtY?si=FD8H_QTu7znz5t6k |
| ४ | ण प ष फ अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1ZVGT0UXOSowMrAC36NvxtPMkleRoBtel/view?usp=drive_link | https://youtu.be/Po88OP5H00A?si=GoQ-u8PrZUpC8zR4 |
| ५ | ट ढ ठ द क्ष अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/196vh7fYJWWVIAD-X-CUrAJwxvytsUnj_/view?usp=drive_link | https://youtu.be/zmL8rjuEECE?si=zLJixv-9a8Wv4rpE |
| ६ | ड इ ई झ ह अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/13aZWs9BAZCTsTmucFV8t5YnQB4p78_xL/view?usp=drive_link | https://youtu.be/psuLxxdgl0E?si=VXX0wxGZ_msTs73h |
| ७ | च घ ध छ अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/11gLkdUBm9OVoJFedbJEwZX9523ro1TBe/view?usp=drive_link | https://youtu.be/MnkZT2zAQMI |
| ८ | य थ ज ङ ऋ अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1kcDSk0mYH8JAx5vdVgEmP149430rFLol/view?usp=drive_link | https://youtu.be/FTwRsmEtQSU |
| ९ | अ आ ओ औ अं ॲ ऑ अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/14HL1fRZAxw3qoNdLEJ43g30yzd48zKpX/view?usp=drive_link | https://youtu.be/47SjRxFLwVM?si=Hix4Md8b4bl-mDCO |
| १० | उ ऊ ए ऐ अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1hYJ_yUUh430sr64GO2W1_mukfilZ9jua/view?usp=drive_link | https://youtu.be/PfAojyLbqf8?si=wHTHGK-bMMC6zNUN |
| ११ | जोड शब्द अक्षर कार्ड वाचन | https://drive.google.com/file/d/1aYeLNj-pyy0nVq_o8_om_GWmCwLLMEk9/view?usp=drive_link | https://youtu.be/bu4iygE2NhQ |
| १२ | आकार विरहित शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1A7jgeOpA37Kmn1kclbfHi4Vv8F_oDU7X/view?usp=drive_link | |
| १३ | कानायुक्त शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1BOdltOpUHbpwTJm0gPzviQFKyHkhkqYH/view?usp=drive_link | |

| | | |
|---|---|---|
| १४ | पहिली वेलांटी शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1WWnXl9D0wnfPzzyW9ftV6YOJtxeTyzDP/view?usp=drive_link |
| १५ | दुसरी वेलांटी शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1DcUJWyC7MLcNmn-oxeLTaZXqwZE0wqJC/view?usp=drive_link |
| १६ | पहिला उकार शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1mJTj-Li1q9aaNtE4L0F3GJ8mCVxvBFPW/view?usp=drive_link |
| १७ | दुसरा उकार शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1EolfZ6c557kl7Fbz_Ga9Fj-COk7OAWHM/view?usp=drive_link |
| १८ | एक मात्रा शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1lxLlyRy0DWZ2rXhm6hpT4ZsiHN2gBy8W/view?usp=drive_link |
| १९ | दोन मात्रा शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1nZbt8NRHNHpvfm-PLzNybV-h8x3Dny9i/view?usp=drive_link |
| २० | एक काना एक मात्रा शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/12ypd2h92BuPmzqaHxCWluj2QKQh66-rT/view?usp=drive_link |
| २१ | एक काना दोन मात्रा शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1fRX9F-098QlnerTx4ml_OxEDxcH4Tgws/view?usp=drive_link |
| २२ | अनुस्वार शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1SObjd8LUVaPTlizxC75uYMvPypjFnLhy/view?usp=drive_link |
| २३ | विसर्ग शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1ouey2VALZJl45-wqMRD5LO3Nnj1y6LuC/view?usp=drive_link |
| २४ | ॲ चे शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1hg-Bg5YPRFCZHC49yXit3lVmBwHCxQQl/view?usp=drive_link |
| २५ | ऑ चे शब्द वाचन | https://drive.google.com/file/d/1k6LcAdVt9SH5H7p9befGVtsQMSqtlINa/view?usp=drive_link |
| २६ | जोडाक्षरी शब्द वाचन | https://drive.google.com/drive/folders/1Jl_fD0d0XufUEv35bt_Fg3hjqqEcppHj?usp=drive_link |
| २७ | वाचनपुस्तिका | https://drive.google.com/drive/folders/1tznzzWcxjVMuKTSd5sHjaqJGLEqbuAP9?usp=sharing |

### ५) नवोपक्रमाची कार्यपद्धती :

#### i. पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :

उपक्रम राबविण्यापूर्वी विद्यार्थ्यांना शब्द वाचन करता येत नव्हते. काही अक्षरे ओळखता येत नसल्याने त्यांना शब्द वाचनात अडथळे येत होते. काही अक्षरे सराव करूनही वारंवार चुकत होती. त्यासाठी विविध उपक्रम निर्मिती करून त्यातीन कृतींमधून अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यास मदत होऊ शकेल.

विद्यार्थ्यांना खालील प्रश्नांच्या आधारे विद्यार्थ्यांना असणाऱ्या ज्ञानाची पायाभूत माहिती घेतली व त्याच्या नोंदी केल्या.

- ग म भ न अक्षरगट वाचता येतो का ?
- ल व ब क ळ अक्षरगट वाचता येतो का ?
- र स श ख अक्षरगट वाचता येतो का ?
- ण प ष फ अक्षरगट वाचता येतो का ?
- ट ढ ठ द क्ष अक्षरगट वाचता येतो का ?
- ड इ ई झ ह अक्षरगट वाचता येतो का ?
- च घ ध छ अक्षरगट वाचता येतो का ?
- य थ ज ज्ञ ऋ अक्षरगट वाचता येतो का ?
- अ आ ओ औ अं अॅ ऑ अक्षरगट वाचता येतो का ?
- उ ऊ ए ऐ अक्षरगट वाचता येतो का ?
- आकार विरहित शब्द वाचन करता येते का ?
- कानायुक्त शब्द वाचन करता येते का ?
- पहिली वेलांटी शब्द वाचन करता येते का ?
- दुसरी वेलांटी शब्द वाचन करता येते का ?
- पहिला उकार शब्द वाचन करता येते का ?
- दुसरा उकार शब्द वाचन करता येते का ?
- एक मात्रा शब्द वाचन करता येते का ?
- दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ?
- एक काना एक मात्रा शब्द वाचन करता येते का ?

- एक काना दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ?
- अनुस्वार शब्द वाचन करता येते का ?
- विसर्ग शब्द वाचन करता येते का ?
- अॅ चे शब्द वाचन करता येते का ?
- ऑ चे शब्द वाचन करता येते का ?
- जोडाक्षरी शब्द वाचन करता येते का ?

## तक्ता क्रमांक १ : पूर्व चाचणीचे मूल्यमापन

| अ.क्र. | तपशील | ओम | आर्ची | मनस्वी | मिताली | कौस्तुभ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग म भ न अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २ | ल व ब क ळ अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| ३ | र स श ख अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| ४ | ण प ष फ अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ५ | ट ढ ठ द क्ष अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ६ | ड इ ई झ ह अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 2 |
| ७ | च घ ध छ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 2 |
| ८ | य थ ज ज्ञ ऋ अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ९ | अ आ ओ औ अं अॅ ऑ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| १० | उ ऊ ए ऐ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ११ | आकार विरहित शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १२ | कानायुक्त शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १३ | पहिली वेलांटी शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १४ | दुसरी वेलांटी शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १५ | पहिला उकार शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १६ | दुसरा उकार शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १७ | एक मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १८ | दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १९ | एक काना एक मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २० | एक काना दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २१ | अनुस्वार शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २२ | विसर्ग शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २३ | अॅ चे शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २४ | ऑ चे शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २५ | जोडाक्षरी शब्द वाचन करता येते का ? | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

( 0 : क्षमता प्राप्त नाही.     1 : क्षमता प्राप्त आहे.)

ii. **कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन :**

नवोपक्रम राबविण्यासाठी दुपारी मध्यान्य भोजनानंतरची तासिका निश्चित करण्यात आली. या तासिकेमध्ये विद्यार्थ्यांना अक्षर गटांच्या क्रमानुसार संगणकावर अक्षर कार्ड दाखविण्यात आले. चित्र बघून विद्यार्थी त्या चित्राने नाव सांगू लागले. ओळखता न आलेल्या चित्राचे नाव ओळखण्यासाठी शिक्षकांनी मदत केली. चित्राचे नाव कोणत्या अक्षरपासून सुरु होते ते वेगळ्या रंगामुळे हायलाईट केलेले असल्याने विद्यार्थ्यांना अक्षर ओळख करण्यासाठी विद्यार्थ्यांना सोपे जाऊ लागले. त्यानंतर त्याच गटाची अध्ययन कार्ड ओळखण्यासाठी देण्यात येत होते. त्यामुळे अक्षर गटातील अक्षरांचे दृढीकरण होण्यास मदत झाली.

एक अक्षर गट झाल्यानंतर इतर अक्षर गट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. असे इतर गटांतील अक्षरांचे दृढीकरण विद्यर्थ्यांकडून करण्यात आले. सुरुवातीला काही विद्यार्थ्यांना अक्षरे ओळखण्यास अडचण येत होती परंतु सरावानंतर ही अडचण दूर झाली. त्यानंतर शब्द वाचनासाठी बनविण्यात आलेले ताक्त्यांनुसार शब्दांचे वाचन घेण्यात येऊ लागले. यातील बहुतेक शब्द हे अक्षर कार्डमधील असल्याने शब्द वाचन हे जलद गतीने झाले. त्यामुळे शब्द वाचनाचे दृढीकरण होण्यास मदत झाली. ज्या ज्या ठिकाणी शिक्षकांची मदत अपेक्षित होती त्या ठिकाणी मदत करण्यात आली. एक तक्ता पूर्ण झाल्याशिवाय दुसरा तक्ता अध्ययनासाठी घेतला जात नव्हता या तक्त्यातील वाचनातील अडथळे त्याच वेळी पूर्ण करण्यात आले. यासाठी सहकारी अध्ययनार्थी यांची मदत घेण्यात आली.

पालकांना Whatsapp वर सदर साहित्याच्या pdf पाठवण्यात आल्या त्यामुळे घरीही पालक याचा सराव घेत असल्याने शब्द वाचनात याचा फायदा झाला.

**iii) उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :**

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी वाटू लागली. चित्रातून अक्षराकडे अक्षराकडून शब्दाकडे असा विद्यार्थ्यांचा वाचानाकडील प्रवास संपला. ८० टक्के विद्यार्थी जोडाक्षरी वाचानापर्यंत पोहचले. 1100 हून जास्त शब्द हे दृश्य स्वरुपात बघितल्यामुळे त्या शब्दातील अक्षराबरोबर शब्दसुद्धा विद्यार्थ्यांच्या लक्षात राहिला. त्याच बरोबर ३४०० हून अधिक शब्दांच्या सरावामुळे विद्यार्थ्यांच्या वाचनाची गती वाढली. विद्यार्थी वाक्य तसेच सोपे उतारा वाचन सहज करू लागले. चित्रांद्वारे अध्ययन झाल्यामुळे वाचन मनोरंजक झाले. ई लर्निंग साहित्यामुळे विद्यार्थ्यांना घरीही याचा सराव करता आला त्यामुळे दृढीकरण होण्यास मदत झाली. एकंदरीत नवोपक्रमातील सर्व उदिष्टे साध्य झाली.

## तक्ता क्रमांक २ : उत्तर चाचणीचे मूल्यमापन

| अ. क्र. | तपशील | ओम | आर्ची | मनस्वी | मिताली | कौस्तुभ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग म भ न अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| २ | ल व ब क ळ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ३ | र स श ख अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ४ | ण प ष फ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ५ | ट ढ ठ द क्ष अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ६ | ड इ ई झ ह अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ७ | च घ ध छ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ८ | य थ ज ञ ऋ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ९ | अ आ ओ औ अं अॅ ऑ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| १० | उ ऊ ए ऐ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| ११ | आकार विरहित शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| १२ | कानायुक्त शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | पहिली वेलांटी शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| १४ | दुसरी वेलांटी शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| १५ | पहिला उकार शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| १६ | दुसरा उकार शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| १७ | एक मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| १८ | दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| १९ | एक काना एक मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २० | एक काना दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २१ | अनुस्वार शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २२ | विसर्ग शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २३ | अॅ चे शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २४ | ऑ चे शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| २५ | जोडाक्षरी शब्द वाचन करता येते का ? | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |

( 0 : क्षमता प्राप्त नाही.    1 : क्षमता प्राप्त आहे.)


**iv) कार्यवाहीत आलेल्या अडचणी :**

हा नवोपक्रम राबविताना असे शब्द शोधणे आवश्यक होते की जे चित्राच्या स्वरुपात दाखवता येतील. तसेच हे शब्द शोधल्यानंतर त्यांची चित्रे इंटरनेटवर शोधणे हे काम जरा आव्हानात्मक होते. तसेच ppt वर सर्व चित्रे व शब्द यांचे एडिटिंग करणे यात काही चित्रांसाठी काहीशी अडचण आली. एका पालकाकडे स्मार्ट मोबाईल नसल्याने त्या विद्यार्थ्याला घरी सराव करता येत नव्हता यासाठी पुस्तिका निर्मिती करण्यात आली. वेळोवेळी येणाऱ्या अडचणी आवश्यक त्याठिकाणी मार्गदर्शकांचे मार्गदर्शन घेवून सोडविण्यात आल्या.

**v) माहितीचे विश्लेषण : आलेख, तक्ते ( आवश्यक वाटल्यास) :**

या नावोप्क्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची आंतरक्रिया योग्यप्रकारे साधली गेली. मुक्त व आनंदपूर्ण वातावरणात मुलांनी शिक्षणाची अनुभूती घेतली. त्यातून अपेक्षित उद्दिष्टे साध्य झाली व गुणात्मक पातळीत वाढ झाली. नवोपक्रमाच्या सुरुवातीच्या काळात पूर्व चाचणी घेतली. यात विद्यार्थ्यांच्या शब्द वाचन व अक्षर वाचन यांचे निरीक्षण करून योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात आल्या. उपक्रमानंतर समांतर उत्तर चाचणी घेतली. विद्यार्थ्यांमधील समाधानकारक बदल व प्रगती व त्याचा आलेख दृष्टीक्षेपात आला. तो खालील आलेख व तक्तांद्वारे दर्शविण्यात आला. आलेख क्रमांक १ मध्ये पूर्व चाचणीमध्ये किती विद्यार्थ्यांना ठरवलेली क्षमता प्राप्त झालेली आहे हे दर्शविण्यात आलेले आहे. आलेख क्रमांक २ मध्ये उत्तर चाचणीमध्ये किती विद्यार्थ्यांना अपेक्षित क्षमता प्राप्त झालेली आहे हे दर्शविण्यात आलेले आहे. तक्ता क्रमांक ३ मध्ये पूर्व व उत्तर चाचणी मधील तुलना दाखवलेली आहे. प्रगतीच्या आलेखावरून १00 टक्के विद्यार्थ्यांना  ग म भ न अक्षरगट, ल व ब क ळ अक्षरगट, र स श ख अक्षरगट, ण प ष फ अक्षरगट, ट ढ ठ द क्ष अक्षरगट, ड इ ई झ ह अक्षरगट, च घ ध छ अक्षरगट, य थ ज ज्ञ ऋ अक्षरगट, अ आ ओ औ अं अॅ ऑ अक्षरगट, उ ऊ ए ऐ अक्षरगट, आकार विरहित शब्द, कानायुक्त शब्द वाचन करता आले. तर ८0 टक्के विद्यार्थ्यांना पहिली वेलांटी शब्द, दुसरी वेलांटी शब्द, पहिला उकार शब्द, दुसरा उकार शब्द, एक मात्रा शब्द, दोन मात्रा शब्द, एक काना एक मात्रा शब्द, एक काना दोन मात्रा शब्द, अनुस्वार शब्द, अॅ चे शब्द , ऑ चे शब्द वाचन करता येऊ लागले. वरील विश्लेषणासाठी वापरलेले तक्ते व आलेख खालीलप्रमाणे आहेत.

## आलेख क्रमांक १ : पूर्व चाचणीमध्ये क्षमता प्राप्त विद्यार्थी



**आलेख क्रमांक २ : उत्तर चाचणीमध्ये क्षमता प्राप्त विद्यार्थी**



### तक्ता क्रमांक ३ : पूर्व चाचणी व उत्तर चाचणी तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | तपशील | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | प्रगती |
|---|---|---|---|---|
| १ | ग म भ न अक्षरगट वाचता येतो का ? | 4 | 5 | 100% |
| २ | ल व ब क ळ अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 5 | 100% |
| ३ | र स श ख अक्षरगट वाचता येतो का ? | 1 | 5 | 100% |
| ४ | ण प ष फ अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 5 | 100% |
| ५ | ट ढ ठ द क्ष अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 5 | 100% |
| ६ | ड इ ई झ ह अक्षरगट वाचता येतो का ? | 2 | 5 | 100% |
| ७ | च घ ध छ अक्षरगट वाचता येतो का ? | 2 | 5 | 100% |
| ८ | य थ ज ज्ञ ऋ अक्षरगट वाचता येतो का ? | 0 | 5 | 100% |
| ९ | अ आ ओ औ अं अॅ ऑ अक्षरगट वाचता येतो का ? | 5 | 5 | 100% |
| १० | उ ऊ ए ऐ अक्षरगट वाचता येतो का ? | 5 | 5 | 100% |
| ११ | आकार विरहित शब्द वाचन करता येते का ? | 0 | 5 | 100% |
| १२ | कानायुक्त शब्द वाचन करता येते का ? | 0 | 5 | 100% |
| १३ | पहिली वेलांटी शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| १४ | दुसरी वेलांटी शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| १५ | पहिला उकार शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| १६ | दुसरा उकार शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| १७ | एक मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| १८ | दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| १९ | एक काना एक मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| २० | एक काना दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| २१ | अनुस्वार शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| २२ | विसर्ग शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| २३ | अॅ चे शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| २४ | ऑ चे शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |
| २५ | जोडाक्षरी शब्द वाचन करता येते का ? | 0 | 4 | 80% |

## आलेख क्रमांक ३ : पूर्व व उत्तर चाचणी तुलनात्मक आलेख




आलेख क्रमांक ३ : प्रगतीचा आलेख
जोडाक्षरी शब्द वाचन करता येते का ?
ऑ चे शब्द वाचन करता येते का ?
अ‍ॅ चे शब्द वाचन करता येते का ?
विसर्ग शब्द वाचन करता येते का ?
अनुस्वार शब्द वाचन करता येते का ?
एक काना दोन मात्रा शब्द वाचन करता येते...
एक काना एक मात्रा शब्द वाचन करता येते...
दोन मात्रा शब्द वाचन करता येते का ?
एक मात्रा शब्द वाचन करता येते का ?
दुसरा उकार शब्द वाचन करता येते का ?
पहिला उकार शब्द वाचन करता येते का ?
दुसरी वेलांटी शब्द वाचन करता येते का ?
पहिली वेलांटी शब्द वाचन करता येते का ?
कानायुक्त शब्द वाचन करता येते का ?
आकार विरहित शब्द वाचन करता येते का ?
उ ऊ ए ऐ अक्षरगट वाचता येतो का ?
अ आ ओ औ अं अ‍ॅ ऑ अक्षरगट वाचता येतो...
य थ ज झ ऋ अक्षरगट वाचता येतो का ?
च घ ध छ अक्षरगट वाचता येतो का ?
ड इ ई झ ह अक्षरगट वाचता येतो का ?
ट ढ ठ द क्ष अक्षरगट वाचता येतो का ?
ण प ष फ अक्षरगट वाचता येतो का ?
र स श ख अक्षरगट वाचता येतो का ?
ल व ब क ळ अक्षरगट वाचता येतो का ?
ग म भ न अक्षरगट वाचता येतो का ?
0%
20%
40%
60%
80%
100%
120%
प्रगती

**१) नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उदिष्टानुसार) :**

नवोपक्रमकर्त्याने निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्व चाचणी व उत्तरचाचणीतील मुल्यमापनावरून कितपत साध्य केली आहेत ते लगेच आपल्या लक्षात येते. यावरून नवोपक्रमाची यशस्विता खालीलप्रमाणे आहे.

१) पूर्व चाचणीद्वारे विद्यार्थ्यांच्या वाचनासंदर्भात समस्येचा शोध घेतला असता त्यावरून उपक्रमाची रूपरेषा ठरविण्यात पूर्व चाचणी उपयुक्त ठरली. विविध स्व निर्मित साहित्याचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या वाचनातील येणाऱ्या समस्या दूर करण्यात आल्या.

२) विद्यार्थ्याची अक्षर ओळख करतना येणारी अडचण दूर झाली.

३) विद्यार्थी न चुकता अक्षर वाचन करू लागले.

४) विद्यार्थी शब्द वाचन करू लागले.

५) विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण झाली.

६) स्व निर्मित ई लर्निंग, अध्ययन कार्ड साहित्याचा अध्ययन अध्यापनात त्याचा परिणामकारक उपयोग करण्यात आला.

७) वाचन उपक्रमाच्या माध्यमातून अधिक मनोरंजक बनले.

८) इतर विषयांशी समवाय साधता आला.

९) विद्यार्थी जलदगतीने वाचन करू लागले.

१०) एकूण ५ विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थी जोडाक्षरी शब्दांचे वाचन करू लागले.

११) या नवोपक्रमासाठी बनविलेल्या कार्ड, व्हिडीओ, वाचनपुस्तिकेचा गुरुवर्य Whatsapp समूहातील ५१८ व गुरुवर्य Community मधील १४ समूहातील शिक्षकांना नक्कीच फायदा झाला. तसेच https://digitalsawantwadi.blogspot.com/ वर सदर कार्ड, व्हिडीओ, वाचनपुस्तिका ठेवण्यात आलेली होती. ब्लॉगवरील भेट दिलेल्या १०००० पेक्षा जास्त शिक्षकांना याचा फायदा झाला.

**७) समारोप :**

वाचनाची पहिली पायरी म्हणजे अक्षर ओळख. अक्षर ओळखण्यात अडथळे निर्माण झाल्यास शब्द वाचन, वाक्यावचन व उतारे वाचन यामध्ये मागे राहण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळीच अक्षर ओळखीमधील विद्यार्थ्यांची अडचण दूर करणे आवश्यक आहे. या नवोपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीने विद्यार्थ्यांना अक्षर ओळख करताना येणारी अडचण दूर होण्यास मदत झाली. तसेच विद्यार्थ्यांना शब्द वाचन करताना येणारी अडचणही दूर झाली. त्याला वाचनाची गोडी निर्माण झाली. विद्यार्थी त्यापुढे जलद गतीने वाक्य व उतारे वाचानापर्यंत पोहचले. या नवोपक्रमासाठी बनविलेल्या स्वनिर्मित साहित्य पूरक साहित्य म्हणून माझ्यासोबत इतर शिक्षकांना नक्कीच उपयोगी पडेल याची मला खात्री वाटते.

**८) संदर्भ सूची व परिशिष्टे :**

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक नवोपक्रम | सिद्धराम माशाळे | अभिषेक प्रकाशन सोलापूर |
| २ | दिशा नवोपक्रमाची | - | म.रा.शै.सं.व प्र.प. पुणे – ३० |
| ३ | दिशा नवोपक्रमांच्या | - | म.रा.शै.सं.व प्र.प. पुणे – ३० |
| ४ | कृतिसंशोधन व नवोपक्रम | डॉ. सुरेश करंदीकर | फडके प्रकाशन |
| ५ | कृतिसंशोधन व नवोपक्रम | स्वाती गाडगीळ | सुविचार प्रकाशन |
| ८ | शैक्षणिक मूल्यमापन | जगताप ह. ना. | फडके प्रकाशन |
| ७ | शैक्षणिक मूल्यमापन | मोकाशी सच्चिदानंद | सुविचार प्रकाशन |
| ८ | संशोधन मार्गदर्शक मालिका (चौदावे पुष्प) | - | य.च.म.मु.वि.नाशिक |
| ८ | संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे | डॉ. आगलावे प्रदिप | - |
| १० | शिक्षणातील संज्ञापनाचे प्रकार | प्रा.देशपांडे प्रकाश | य.च.म.मु.वि.नाशिक |
| ११ | मुक्त विद्यापीठीय संशोधन | डॉ. अनंत जोशी<br>सौ. संजीवनी मदाले | य.च.म.मु.वि.नाशिक |

**परिशिष्ट :**

- **सहभागी विद्यार्थी यादी :**

    १) ओम दिपक सावंत

    २) आर्ची स्वप्निल सावंत

    ३) मनस्वी सुभान सावंत

    ४) मिताली महेंद्र पेंडुरकर

    ५) कौस्तुभ प्रशांत सावंत

# पूर्व चाचणी

❖ **खालील अक्षरे वाचा.**

ग म भ न    ल व ब क ळ    र स श ख    ण प ष फ

ट ढ ठ द क्ष    ड इ ई झ ह    च घ ध छ    य थ ज ज्ञ ऋ

अ आ ओ औ अं अॅ ऑ    उ ऊ ए ऐ

❖ **खालील शब्द वाच.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नस | कर | छत | गज | पळ |
| खार | डाळ | लाटा | गारवा | काच |
| विळा | शिळा | मिसळ | हिवाळा | निरमा |
| शीर | गीत | भीम | रिती | परीक्षा |
| मुळा | सुई | खुशी | कुरण | सुभाष |
| गूढ | तूप | रूळ | डूक | पूजा |
| भेळ | मेघ | मेख | मेथी | केळी |
| गॅस | रॅश | पॅक | ॲसिड | पिरॅमिड |
| गैर | लैला | चैनी | बैठक | शैवाळ |
| ढोल | दोरी | ओळ | गोटी | डोली |
| लॉज | डॉट | लॉरी | हॉटेल | ऑफर |
| चौदा | भौम | गौळण | भौतिक | चौपट |
| फंड | कंद | कंठा | चंदू | भेंडी |
| मूलतः | निःपक्ष | मनःपूर्वक | चतुःसूत्री | अक्षरशः |
| गल्ला | चक्का | पन्नास | उत्तम | सुसज्ज |

# उत्तर चाचणी

❖ **खालील अक्षरे वाचा.**

ग म भ न    ल व ब क ळ    र स श ख    ण प ष फ

ट ढ ठ द क्ष    ड इ ई झ ह    च घ ध छ    य थ ज ज्ञ ऋ

अ आ ओ औ अं अॅ ऑ    उ ऊ ए ऐ

❖ **खालील शब्द वाच.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बळ | जप | मन | खण | थर |
| खार | डाळ | लाटा | गारवा | काच |
| विळा | शिळा | मिसळ | हिवाळा | निरमा |
| शीर | गीत | भीम | रिती | परीक्षा |
| पुडा | जुडी | गुणी | मुसळ | दुकान |
| गूढ | तूप | रूळ | डूक | पूजा |
| चेस | शेण | मेष | पेरू | फुले |
| मॅन | हॅव | जॅम | पॅरीस | टॅबलेट |
| जैन | कैची | ऐनक | हैराण | हैरान |
| लोक | होडी | कोय | घोस | तोरा |
| हॉबी | बॉस | हॉलर | लॉकर | डॉलर |
| सौदा | चौकी | चौधरी | नौरस | औषध |
| रंग | तंग | मंदा | डिंक | रांगा |
| वस्तुतः | निःशंक | मनः शांती | उषःकाल | यशःकीर्ती |
| पक्का | हल्ला | डुक्कर | इयत्ता | मुद्दल |